# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक ११/०७/२०२३ चे ठराव**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३७३** **विषय क्रमांक – ३७३**

**दिनांक- ११/०७/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३७३ दिनांक- ११/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक बक्षेका/स्था/०६/९४/२०२३ दिनांक १५/०६/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १८४० दि.२७/६/२०२३ अन्वये, स्थापत्य ब क्षेत्रिय कार्यालयाकडील विकास कामांसाठी सन २०२३-२४ च्या मुळ अंदाजपत्रकातील कामाच्या तरतुदीमध्ये वाढ/ घट करणेबाबत. |
| **ठराव क्र. ३७३ दिनांक- ११/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक बक्षेका/स्था/०६/९४/२०२३ दिनांक १५/०६/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १८४० दि.२७/६/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका ब क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील सन २०२३-२४ च्या मुळ अंदाजपत्रकातील चालू तसेच पूर्ण झालेल्या कामांना उर्वरीत शिल्लक तरतूद विभागातंर्गत वाढ / घट करून खालील नमूद कामांना तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे. |

| अ. क्र. | कामाचे नाव | बजेट कोड | लेखाशिर्ष | सन २०२३-२४ चे | | सन २०२३-२४ ची मुळ तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन २०२३-२४ साठी एकुण सुधारीत तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पान क्र. | अ.क्र. | | | | |
| १ | सन २०२१-२२ करिता प्रभाग क्र.१८ मध्ये गांधीपेठ, पडवळ आळी, चिंचवड गावठाण परिसरातील फुटपाथ, नाला, स्ट्रॉर्म वॉटर, चेंबर्स व पेव्हिंग ब्लॉकची दुरूस्ती करणे. | 222308956 | किरकोळ देखभाल व दुरूस्ती- महसुली | २८२ | ३० | १००० | १६२०००० | ० | १६२१००० |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | सन २०२०-२१ करिता प्रभाग क्र.१८ मध्ये गांधीपेठ, पडवळ आळी, चिंचवड गावठाण परिसरातील फुटपाथ, नाला, स्टोम वॉटर, चेंबर्स व पेव्हिंग ब्लॉकची दुरूस्ती करणे. | 222308923 | किरकोळ देखभाल व दुरूस्ती-महसुली | २८१ | ५ | १६२०००० | ० | १६२०००० | ० |
| | ३ | चिंचवड भाजी मंडईतील स्थापत विषयक कामे करणे. | 222308920 | किरकोळ देखभाल व दुरूस्ती-महसुली | २८१ | ४ | १२००००० | ० | ७००००० | ५००००० |
| | ४ | सन २०२३ - २४ करिता प्रभाग क्र.१८ ठिकठिकाण आवश्यकतेनुसार स्थापत्य विषयक फुटपाथची दुरूस्तीची कामे करणे | 232400896 | रस्ते व फुटपाथ | ११२ | १० | १००० | १५००००० | ० | १५०१००० |
| | ५ | सन २०२३ - २४ करिता प्रभाग क्र. १८ परीसरामध्ये ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार डांबरीकरण करणे. | 232400871 | रस्ते व पुल | १०९ | २ | ५५००००० | ० | ३०००००० | २५००००० |
| | ६ | सन २०२३-२४ करीता प्रभाग क्र.१८ मधील श्रीमान महासाधु मोरया गोसावी संजीवनसमाधी उत्सवासाठी मंड व्यवस्था करणे. | 232402177 | किरकोळ देखभाल व दुरूस्ती | २८७ | १५ | १००० | १०००००० | ० | १००१००० |
| | ७ | सन २०२३-२४ करिता प्रभाग क्र. १८ मधील क्रांतिवीर चापेक शाळामध्ये स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे. | 232404318 | प्राथमिक व दुय्यम शिक्षण | ७९२ | ५ | १००० | १५००००० | ० | १५०१००० |
| | ८ | सन २०२० - २१ करीता प्रभाग क्र १८ मधील रुग्णालयांची दुरुस्ती करणे. | 222308199 | रूग्णालय | ७९२ | १ | १०००००० | ० | १०००००० | ० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | सन २०२३-२४ करिता प्रभाग क्र. १८ मधील रूग्णालयांची दुरूस्ती करणे | 232404320 | रूग्णालय | ७९३ | १ | १००० | १६००००० | ० | १६०१००० |
| १० | क्रांतिवीर चापेकर वाड्याच्या तिस-या टप्प्याची कामे करणे (भाग-२) | 222300155 | विशेष योजना | ४५ | १ | ८००००० | २५०००००० | ० | २५८००००० |
| ११ | क्रांतिवीर चापेकर वाड्याच्या तिस-या टप्प्याची कामे करणे (भाग-३) | 222300156 | विशेष योजना | ४५ | २ | ६८०००००० | ० | २६५००००० | ४१५००००० |
| १२ | सन २०२३-२४ करीता प्रभाग क्र. १८ परीसरामध्ये विविध कंपन्या/मनपा मार्फत खोदण्यात आलेलेले चर दुरूस्त करणे. | 232400899 | रस्ते | ११२ | २ | १००० | २५००००० | ० | २५०१००० |
| १३ | सन २०२३-२४ करीता प्रभाग क्र. १८ मधील कामांची अंतीम बीले अदायगी करणे. | 232402204 | किरकोळ देखभाल व दुरूस्ती-महसुली | २८८ | ४२ | २०००००० | ० | १९००००० | १००००० |
| | एकुण | | | | | ८०१२६००० | ३४७२०००० | ३४७२०००० | ३६०२५००० |

वरील प्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अनुसूची ८ मधील प्रकरण ७ तरतूद २(१) अन्वये मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३७४** **विषय क्रमांक – ३७४**

**दिनांक- ११/०७/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३७४ दिनांक- ११/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक सविवि/०५/कावि/२६१/२०२३ दिनांक १९/०६/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १८७१ दि.२७/६/२०२३ अन्वये, तृतीयपंथी (ट्रान्सजेंडर) समुदायासाठी कौशल्य प्रशिक्षण देणेबाबत. |
| **ठराव क्र. ३७४ दिनांक- ११/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक सविवि/०५/कावि/२६१/२०२३ दिनांक १९/०६/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १८७१ दि.२७/६/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत पिंपरी चिंचवड शहरातील समाजातील अत्यंत दुर्लक्षित घटक म्हणजे तृतीयपंथी व्यक्ती, या घटकांच्या विविध स्तरावर विविध समस्या आहेत. त्यांच्या समस्यांचे निराकरण करणे, त्यांना मानसिक आधार देणे, त्यांच्या विविध प्रश्नांवर योग्य समुपदेशन करणे आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे इत्यादी गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असून TRUST HEALTHCARE FOUNDATION यांचेकडील तृतीयपंथी (ट्रान्सजेंडर) समुदायासाठी कौशल्य प्रशिक्षण कोर्सेस राबविणे या कामाची गरज व उपलब्ध कालावधी विचारात घेता, सदरचे काम हे ई-टेंडरींग पध्दतीने निविदा प्रसिध्द संस्थेस देणे आवश्यक आहे. या बाबत विभागा मार्फत इतर कल्याणकारी योजने अंतर्गत तृतीयपंथी कल्याणकारी योजना राबवण्यात येतात. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात तृतीयपंथी योजना या उपलेखाशिर्षावर र.रु.२५,००,०००/- (अक्षरी र.रू.पंचवीस लाख फक्त) इतकी तरतूद करणेत आलेली आहे. **TRUST HEALTHCARE FOUNDATION** दिनांक- **१७/०३/२०२३** रोजीच्या पत्रान्वये ट्रान्सजेंडर समुदायासाठी कौशल्य प्रशिक्षण देणे बाबतचा प्रस्ताव सादर केलेला असून, सदर प्रस्तावानुसार पिंपरी चिंचवड शहरातील तृतीयपंथी **(**ट्रान्सजेंडर**)** समुदायासाठी कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यास इच्छूक आहेत. सदर प्रस्तावामध्ये देण्यात येणा-या कौशल्य प्रशिक्षण कोर्सेस, कोर्स कालावधी, शैक्षणिक अर्हता, वयोगट, कोर्स फी, अतिरिक्त कर व अन्य माहिती सोबत सादर केलेली असून, त्याबाबतचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे आहे.<br>प्रशिक्षणाचे ठिकाण - सदरचे प्रशिक्षण कोर्सेस राबवयाचे असल्यास, त्याचे ठिकाण हे मनपा कार्यक्षेत्रातील ठिकाणी चिंचवड येथे सूचविण्यात आलेली आहेत.<br>प्रशिक्षणाचे फायदे - सदर प्रशिक्षण दिले नंतर ८०% लोकांचा (transgender) फायदा होणार आहे. व अभ्यासक्रम पुर्ण झाल्यानंतर १००% नोकरी सहाय्य दिले जातील असे कळविले आहे.<br>प्रशिक्षणाबाबत इतर बाबी - |

| | |
|---|---|
| | प्रशिक्षण वर्ग सुरू करावयाचे असल्यास, त्याबाबत किमान एक आठवडा अगोदर कळविण्यात यावे. तसेच प्रशिक्षण वर्गाचे ठिकाणी संबंधित प्रशिक्षणार्थींना ने-आण करण्याची जबाबदारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने घेणेबाबत कळविले आहे.<br>TRUST HEALTHCARE FOUNDATION यांचेकडील तृतीयपंथी (ट्रान्सजेंडर) समुदायासाठी कौशल्य प्रशिक्षण कोर्सेस राबविणे या कामाची गरज व उपलब्ध कालावधी विचारात घेता, सदरचे काम हे विना-निविदा सदर संस्थेस देणे आवश्यक असुन सदर प्रस्ताव सादर केला आहे. तसेच सदर प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यास व याकामी येणा-या खर्चास मान्यता घेणे आवश्यक आहे.<br>➢ TRUST HEALTHCARE FOUNDATION यांचेकडील प्रस्तावानुसार संबंधित सर्व प्रशिक्षण शुल्काची रक्कम + अतिरिक्त कर इ. रक्कम ही लाभार्थींचा कोर्स सुरू होणेपूर्वी संस्थेस आगाऊ स्वरूपात अदा करणेकामी कळविले आहे. परंतू, सदर प्रशिक्षण शुल्काची रक्कम आगाऊ ऐवजी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थींनुसार अदा करणे आवश्यक आहे.<br>➢ साधारण खर्च अंदाजे र.रु. ४,००,०००/- इतका आहे.<br>➢ लाभार्थ्यांच्या प्रतिसादानुसार यात घट वा वाढ होऊ शकते. लाभार्थ्यांचा प्रतिसाद वाढल्यास खर्चाची रक्कम / कामाचा कालावधी याबाबत मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करावी लागेल.<br>TRUST HEALTHCARE FOUNDATION यांचेकडील प्रस्तावानुसार संबंधित सर्व प्रशिक्षण शुल्काची रक्कम + अतिरिक्त कर इ. रक्कम ही लाभार्थींचा कोर्स सुरू होणेपूर्वी संस्थेस आगाऊ स्वरूपात अदा करणेकामी कळविले आहे. परंतू, सदर प्रशिक्षण शुल्काची रक्कम आगाऊ ऐवजी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थींनुसार अदा करणेत येईल. लाभार्थ्यांच्या प्रतिसादानुसार यात घट वा वाढ होऊ शकते. लाभार्थ्यांचा प्रतिसाद वाढल्यास खर्चाची रक्कम/ कामाचा कालावधी याबाबत मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करावी लागेल. प्रशिक्षण वर्गाचे ठिकाणी संबंधित प्रशिक्षणार्थींना ने-आण करण्याची जबाबदारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने घेणेबाबत कळविले असून,त्यानुसार प्रशिक्षणार्थींचा वाहतूकीचा खर्च महानगरपालिका करेल, TRUST HEALTHCARE FOUNDATION यांचेकडील तृतीयपंथी (ट्रान्सजेंडर) समुदायासाठी कौशल्य प्रशिक्षण देणे बाबत राबविणेकामी TRUST HEALTHCARE FOUNDATION यांची नियुक्तीकामी सोबतचे प्रपत्र “अ” नुसार द्यावयाचे प्रशिक्षण (कोर्सेस) इत्यादी सादर करण्यात आलेले असूनव याकामी याकामी प्रशिक्षणाच्या शुल्काची / खर्चाची रक्कम + अतिरिक्त कर असे एकूण रक्कम ही महापालिका अंदाजपत्रकातील इतर कल्याणकारी योजनेच्या तृतीयपंथी कल्याणकारी योजना या उपलेखाशिर्षाच्या उपलब्ध तरतूदीमधून करण्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३७५** **विषय क्रमांक – ३७५**

**दिनांक- ११/०७/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३७५ दिनांक-११/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक पापूजनि/हक्षे/कावि/१८९/२०२३ दिनांक २७/०६/२०२३ अन्वये, ह क्षेत्रिय कार्यक्षेत्रात नलिकांची वार्षिक् यांत्रिकी साफसफाई करणेकामी तरतूद वर्गीकरण करणे बाबत. |
| **ठराव क्र. ३७५ दिनांक-११/०७/२०२३** | ह क्षेत्रिय कार्यक्षेत्रामध्ये पिंपरी चिंचवड मनपा च्या ह प्रभागातील नलिकांची वार्षिक यांत्रिकी पद्धतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे हे काम चालू आहे. सदर कामाची मुदत ५ वर्षासाठी आहे. ती मुदत दि.-११/०६/२०२३ रोजी संपत आहे. त्यामुळे अशा प्रकारचे काम करण्यासाठी नवीन निविदा काढावी लागणार आहे. परंतु नवीन निविदा काढणेसाठी सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात या कामाच्या नावाचा समावेश नसल्यामुळे सदर कामाचा सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात 23059- Repairs & maintenanse - others या लेखाशिर्षाखाली पान क्र.744 अ.क्र.140 समावेश करून सदर कामावर खालील प्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रभाग क्र | सन २०२३-२४ चे पा. क्र व अ.क्र | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२३-२४ ची मूळ तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | सन २०२३-२४ साठी एकूण सुधारीत तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पिंपरी चिंचवड मनपा च्या ह प्रभागातील नलिकांची यांत्रिकी पद्धतीने वार्षिक साफसफाई करणे व चोकअप | सर्वसाधारण | अंदाजपत्रकात नविन नाव नाही | ७५,०००,००० | ० | ५,०००,००० | ० | ५,०००,००० | अंदाजपत्रकात नावाचा समावेश करणे तरतूद अ क्र.२ वरील कामावरुन वर्ग |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | काढणे. (२०२३-२०२४) | | | | | | | | | |
| | 2 | पिंपरी चिंचवड मनपा च्याह प्रभागातील नलिकांची ठेकेदारी पद्धतीने वार्षिक साफसफाई करणे व चोकअप काढणे | सर्वसाधारण | ७३० | १८८ | १२,०००,००० | १,२८,६७,००० | ० | ५,०००,००० | ७८६७००० | तरतूद अ.क्र.१ चे कामावर वर्ग |
| | | एकूण | | | | | १.२८,६७,००० | ५०,००,००० | ५०,००,००० | १,२८,६७,००० | |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३७६** **विषय क्रमांक – ३७६**

**दिनांक- ११/०७/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३७६ दिनांक-११/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक नरवि/कावि/३३/९४/२०२३ दि.४/७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मौजे रहाटणी (काळेवाडी) ता.हवेली येथील स.नं.९५, ९६, ९७ व ९९ पैकी मधील मंजुर विकास योजने व्यतिरिक्त ९.०० मी. रस्ता बाधीत जमीनीचे भूसंपादन करणेबाबत. |
| **ठराव क्र. ३७६ दिनांक-११/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक नरवि/कावि/३३/९४/२०२३ दि.४/७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसुचना क्र. टीपीएस –१८९३/१४१२/युडी-१३,दि.२८/११/१९९५ अन्वये मंजूर विकास योजनेतील व महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसुचना क्र. पीसीएन-१६९७/९३४/प्र.क्र.८९/नवि-२२ दि.१५/११/१९९७ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे. मौजे रहाटणी (काळेवाडी) ता.हवेली येथील मंजुर विकास योजने व्यतिरिक्त ९.०० मी. रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पत्र क्र.नरवि/कावि/३ब१/३७५/०६ दि.१०/०३/२००६ रोजी सादर करण्यात आलेला असून प्रस्तुत भूसंपादनाची कार्यवाही विशेष भूमिसंपादन अधिकारी, विशेष घटक क्र.१, पिंपरी, पुणे -१८ यांचे मार्फत चालू होती. सदर भूसंपादनास व त्याकामी येणा-या खर्चास मा.स्थायी समिती |

<table>
<tr><td></td><td>ठराव क्र.१०८१० दि.०९/०८/२००६ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर भूसंपादन करणेकामी संयुक्त मोजणी झाली असून सुसंगत अहवाल पाठविला आहे. त्यानुसार मौजे रहाटणी (काळेवाडी) ता.हवेली येथील मंजुर विकास योजने व्यतिरिक्त ९.०० मी. रस्ता या प्रयोजनासाठी नविन भूसंपादन २०१३ च्या कायद्यान्वये भूसंपादन करण्यास मा.महापालिका सभेची मंजूरी आवश्यक आहे.  दि.२६/०४/२०२३ अन्वये मोरया कॉलनी विजय नगर काळेवाडी येथील नागरिकांनी सदर प्रकरणी भूसंपादनाची कार्यवाही करणेकामी विनंती अर्ज केलेला आहे. त्यानुसार उक्त रस्त्याचे खालील तक्यात दर्शविलेल्या प्रमाणे भूसंपादन करणे आवश्यक आहे.<br><br>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>आ. क्र.</th><th>रस्त्याचे प्रयोजन</th><th>स. नं.</th><th>बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी.</th></tr>
<tr><td>१.</td><td>-</td><td>९.०० मी. रस्ता</td><td>मौजे रहाटणी येथील स.नं.९५, ९६, ९७ व ९९ पैकी</td><td>३८७९.०० चौ.मी.</td></tr>
</table>
<br>उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम -२०१३(नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेकरीता मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.</td></tr>
<tr><td>निर्णय</td><td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका  सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td></tr>
</table>

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३७७** **विषय क्रमांक – ३७७**

**दिनांक- ११/०७/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३७७ दिनांक-११/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक साप्रवि/०७/कावि/२९५/२०२३ दि.५/७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड मनपाच्या समाज विकास विभागाकडील पदनिर्मिती बाबत व मानधन तत्वावर काम करणा-या समूह संघटकांना मनपाच्या सेवेत सामावून घेणेबाबत. |
| **ठराव क्र. ३७७ दिनांक-११/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक साप्रवि/०७/कावि/२९५/२०२३ दि.५/७/२०२३ अन्वये,  पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा समावेश ब वर्ग महापालिकेत झाला असून, शासनाच्या नगरविकास विभागाने पुणे मनपाच्या धर्तीवर आकृतीबंध तयार |

| | |
|---|---|
| | करण्याबाबत सूचविले आहे. त्यानुसार सुधारीत आकृतीबंध २०२३ शासन मान्यतेकामी यापुर्वी पाठविणेत आलेला आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागात मानधनावर कार्यरत असणा-या १७ समूह संघटकांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेणेबाबत सकारात्मक विचार करणेबाबतचा विनंती अर्ज दि.१५/०५/२०२३ रोजी सादर केलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविणेत येतात. यामध्ये महिला बालकल्याण योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना, अपंग कल्याणकारी योजना, इतर कल्याणकारी योजनांचा समावेश आहे. या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होणेसाठी समूह संघटकांची तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर ६ महिने कालावधीसाठी नेमणूक करणेत येते. महापालिकेच्या योजनांचा प्रचार व प्रसिध्दी करणे, बचतगट व संबंधित बँकांची संलग्नता करणे, विविध सर्व्हेक्षणाकरिता सहाय्य करणे, बचतगटांचे बैठकीचे आयोजन करणे, सदर बैठकांस उपस्थित राहणे, समाज विकास अधिका-यांमार्फत देण्यात येणा-या नवीन उद्दिष्टे तसेच कर्तव्यांचे पालन करणे इ.कामकाज समूह संघटकांमार्फत करणेत येते. समाज विकास विभागातील कल्याणकारी योजनांचा प्रचार व प्रसार करणे तसेच कल्याणकारी योजनांचे अर्ज तपासणी कामकाज समूहसंघटकांकडून करुन घेणेत येते. समाज विकास विभागासाठी एकुण २० समूह संघटकांची मानधन तत्वावर ६ महिने कालावधीसाठी नेमणूक करणेस मान्यता आहे. त्यानुसार जाहिर प्रकटन वर्तमान पत्रात प्रसिध्द करुन लेखी चाचणी व मौखिक चाचणीव्दारे सन २००३ सालापासून वारंवार सेवाकालावधी खंडीत करुन पुनश्च नियुक्ती देऊन आरक्षणानुसार एकुण २० समूह संघटकांपैकी १७ समूह संघटक सहा महिने कालावधीसाठी मानधन तत्वावर समाज विकास विभागात कार्यरत आहे. समूह संघटकांमार्फत समाज विकास विभागाकडील जागतिक महामारी कोविड १९, उमेद जागर, नवी दिशा, स्टीचिंग(शिलाई) युनिट, तृतीयपंथी, दिव्यांग बचत गट, पीएम स्वानिधी,सोशल सपोर्ट ग्रुप अशा प्रकारे विविध उपक्रम राबविणेत आलेले आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सुधारीत आकृतीबंध शासनाकडे मंजुरीकामी यापुर्वी पाठविणेत आलेला असून सुधारीत आकृतीबंधामध्ये समाज विकास विभागासाठी एकुण १८ समूह संघटक पदे तसेच समाज विकास विभागांतर्गत स्वतंत्र दिव्यांग कक्षाची निर्मीती करण्यात आली असून त्यासाठी एकुण १० समूह संघटक असे एकुण २८ समूह संघटक पदे कायमस्वरुपी असलेने मान्यतेकामी पाठविणेत आलेली आहेत. या आकृतीबंधास अद्याप मान्यता मिळालेली नाही. तथापि समाज विकास विभागातील १७ समूह संघटकांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत कायमस्वरुपी सामावून घेणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे. त्यानुसार समाजविकास विभागाकडील कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने १७ समूहसंघटक मानधन कर्मचारी यांना महानगरपालिका आस्थापनेवर सामावून घेणेसाठी अधिसंख्य पदांची निर्मीती करण्यास शासन मान्यता मिळावी यासाठी तसेच शासनामार्फत आकृतीबंध मंजूरीनंतर या अधिसंख्य पदावर नियुक्त केलेल्या समूहसंघटक यांना कायमस्वरुपी महापालिका आस्थापनेवर सामावून घेणेकामी शासन मान्यता असावी यासाठी प्रस्ताव सादर करणेत येणार असल्याने. सदरच्या |

| | |
|---|---|
| | विषयास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३७८** **विषय क्रमांक – ३७८**

**दिनांक- ११/०७/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३७८ दिनांक-११/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक मपुर/वि/कावि/५७३/२०२३ दि.७/७/२०२३ अन्वये, मेट्रो प्रकल्पाअंतर्गत दापोडी ते पिंपरी मेट्रो पुलाखाली सुशोभित खांब व दिवे बसविणे या विद्युत विषयक कामांतर्गत सुधारित प्रशासकीय मान्यता देणे बाबत. |
| **ठराव क्र. ३७८ दिनांक-११/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक मपुर/वि/कावि/५७३/२०२३ दि.७/७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात मुंबई पुणे रस्त्यावर मेट्रो मार्फत दापोडी ते पिंपरी येथे नवीन मेट्रो चे कामकाज सुरु आहे. सदर मुंबई पुणे रस्त्यावर दापोडी ते पिंपरी दरम्यान म.न.पा. मार्फत नागरिकांच्या सुरक्षितेच्या दृष्टीकोनातून प्रकाश व्यवस्था करण्यात आली आहे. परंतु मेट्रोच्या कामामध्ये आवश्यकतेनुसार स्ट्रीट लाईट पोल/फिटिंग शिफ्ट करणे/काढणे/ पोल फाउंडेशन व आर्थिंग इत्यादी विद्युत विषयक बाबी वारंवार केल्या आहेत मेट्रोलाईचे कॉलम दुभाजकात असल्याने रस्ता दुभाजकावरील स्ट्रीट लाईट यंत्रना कडेला शिफ्ट केली आहे. सदय स्थितीमध्ये मेट्रो कॉलमचे काम पूर्ण झाले असून कडेला झाडांमध्ये आलेले पोल दुभाजकात घेणे आवश्यक आहे. तसेच या मुख्य रस्तयावरील वाहतूक लक्षात घेता रस्त्याचे सुशोभिकरण करणे आवश्यक आहे. त्यासाठी मेट्रो कॉलम प्रकाश झोत टाकूण सुशोभिकरण शक्य आहे. अशा प्रकारची कामे करण्यासाठी मा.आयुक्त् यांच्या सूचना आहेत. त्यामुळे सदर विद्युत विषयक कामे पुनश्चः करणे गरजेचे आहे. तसेच मेट्रो पुलाखाली सुशोभिकरणाच्या अनुषंगाने मेट्रोचे खांब व आजूबाजूचा परिसर आकर्षक एल.ई.डी. फिटिंगने प्रकाशित करण्याचे काम मुंबई पुणे विद्युत विभागामार्फत करण्यात येणार आहे. सदर दापोडी ते पिंपरी मेट्रो पुलाच्या विद्युत विषयक कामाचे अंदाजपत्रक इकडील विभागामार्फत तयार केले असता त्यास अंदाजे १२ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.परंतु सदर कामाकरिता सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रका मध्ये पानांक ४७३ अनुक्रमांक १२३ अन्वये र. रु. २ कोटी इतकी प्रशासकीय मान्यता व र.रु १०००/- इतकी तरदूत उपलब्ध आहे. सदर कामाची निविदा रक्कम जी.एस.टी. सह सन २०२३ - |

<table>
<tr><td></td><td>२४ च्या अंदाज पत्रकातील नमूद प्रशासकीय मान्यतेपेक्षा अतिरिक्त होत आहे. त्यामुळे सदर कामांस सुधारित प्रशासकीय र.रु. १५ कोटी इतकी मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर कामास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर कामांचा तपशील खालीलप्रमाणे<br><br>

<table>
<tr><th>अनु. क्र.</th><th>लेखाशीर्ष</th><th>कामाचे नाव</th><th>अंदाज पत्रक पानांक / अनु क्र.</th><th>बजेट कोड</th><th>उपलब्ध तरतूद र.रु.</th><th>अंदाजपत्रकीय र.रु.</th><th>सुधारित अंदाजपत्रकीय र.रु.</th></tr>
<tr><td>१.</td><td>स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे.</td><td>बी मेट्रो प्रकल्पाअंतर्गत दापोडी ते पिंपरी मेट्रो पुलाखाली सुशोभित खांब व दिवे बसविणे. (सन २०२२-२४)</td><td>४७३/१२३</td><td>23240323 8</td><td>1000</td><td>20000000</td><td>150000000</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td>1000</td><td>20000000</td><td>150000000</td></tr>
</table>

<br>वरील प्रमाणे विषयांकीत कामाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.</td></tr>
<tr><td>निर्णय</td><td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td></tr>
</table>

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३७९** **विषय क्रमांक – ३७९**

**दिनांक- ११/०७/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३७९ दिनांक-११/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक जशुके/३/वि/१३४/२०२३ दि. १०/०७/२०२३ अन्वये, मनपाचे लांडेवाडी येथे नव्याने होणा-या संपवर पंपिंग मशिनरी बसविणे व अनुषंगिक यंत्रणेची कामे करणे (दिघी करीता) साठी सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ३७९ दिनांक-११/०७/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक जशुके/३/वि/१३४/२०२३ दि. १०/०७/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत भोसरी येथील नविन संप बांधणेत आला असुन, त्यापासुन नविन ६०० एम्एम् ची नविन पाईप लाईन टाकणेत आली असुन, त्या द्वारे दिघी येथील पाण्याची टाकी भरणेत येणार असल्याने, त्या करीता नविन पंम्पीग मशनिरी बसविणे बाबत ह्या कामाचे सल्लागार मे.डी.आर.ऐ, कन्सलटंन्ट, पुणे |

| | |
|---|---|
| | यांनी त्यांच्या कडील पत्र क्र DRA/PCMC/403/2023/1596 दि. 13/01/23 अन्वये कळविणेत आले आहे. त्या प्रमाणे सदर ठिकाणची पाहणी करुन सदरच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्या करीता र.रु. ३,००,००,०००/- (अक्षरी-रक्कम रु तीन कोटी) इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर कामाकरीता सन २०२३-२०२४ चे अंदाजपत्रकामध्ये शुध्द अशुध्द जलउपसा केंद्र से.23 या लेखाशिर्षाखाली पानांक ६६८ व अ.क्र. २ वर कामाची अंदाजपत्रकीय र.रू. २,००,००,०००/- नमुद असुन अंदाजपत्रकीय तरतुद र.रू. ५०,००,०००/- करणेत आलेली आहे. सदर कामास मा. सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ३०६ दिनांक २९/३/२०२३ अन्वये रक्कम रु २,००,००,०००/-(अक्षरी रक्कम रु दोन कोटी फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. दिघी करिता भोसरी येथील नवीन पंप बसविण्याची अंदाजपत्रक तयार केले असता ते अंदाजपत्रक रक्कम रुपये तीन कोटीचे होत आहे, परंतु सदर कामासाठी सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात अंदाजपत्रकीय र.रु. २,००,००,०००/- (अक्षरी-रक्कम रुपये दोन कोटी) इतकी नमूद करण्यात आली आहे त्यामुळे त्याच रकमेस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे त्यामध्ये वाढ करुन रक्कम रु. ३,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रु तीन कोटी फक्त) या प्रशासकीय रक्कमेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**